वि.दिवाणी दावा क्र.१७१/२०१५
सीएनआर नं.एमएचटीएच १७००१५२५२०१५

**आदेश नि.२४४**

१. अर्ज त्यावरील म्हणणे व कागदपत्राचे अवलोकन करुन दोन्ही वकीलांचा युक्तीवाद विचारात घेवून असे निदर्शनास येते की, प्रतिवादीने अधिका पूरावा देण्याकरीता मुदत मिळण्याकरीता अर्ज केलेला आहे.

२. अर्जास वादींनी विरोध केलेला आहे. प्रतिवादीने अशाच स्वरुपाचा अर्ज मागील तारखेस केलेला आहे. प्रतिवादी जाणूनबुजून पूरावा देण्यास टाळाटाळ करीत आहे. प्रतिवादी वेळकाढूपणा करीत आहे. त्यामुळे अर्ज फेटाळावा अशी विनंती केली आहे.

३. या सर्व गोष्टींचा विचार करुन असे दिसून येते की, प्रतिवादी यास अधिक पूरावा देण्यासाठी संधी यापूर्वी दिलेली होती. प्रकरण जुने आहे. परंतू नैसर्गिक न्यायतत्वानुसार अजून प्रतिवादीस अजून एक संधी दिली तर वादींचे कोणतेही नुकसान होणार नाही. म्हणून खालील आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

१. अर्ज २५०/- खर्चावर मंजूर करण्यात येतो.
२. खर्चाची रक्कम वादी यांना दयावी.
३. यापूढे वेळ मिळणार याची स्पष्ट कल्पना प्रतिवादीला देण्यात येते.

KIRAN RANGRAO DESHPANDE
Digitally signed by KIRAN RANGRAO DESHPANDE
Date: 2022.12.15 11:04:18 +0530

पालघर
दिनांक : १४/१२/२०२२

(किरण रं. देशपांडे)
दिवाणी न्यायाधीश, व.स्तर,
पालघर